# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील रेल्वे स्थानक परिसरातील अतिक्रमणाबाबत**

**(१) ४४५३८ (०३-०६-२०१६) श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रेल्वे स्थानकानजिक महानगरपालिका हद्दीमध्ये अनाधिकृत फेरीवाल्यांच्या वास्तव्यामुळे प्रवाशी व नागरीक त्रस्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कारवाई करण्यास रेल्वे पोलिस, महानगरपालिका प्रशासन तसेच स्थानिक पोलिस अधिका-यांनी आपल्या हद्दीची मर्यादा दाखवून टाळाटाळ करीत असल्याच्या नागरिकांसह लोकप्रतिनिधींच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी रेल्वे पोलिस, महानगरपालिका प्रशासन व स्थानिक पोलिस यांचेमधील समन्वयाबाबत व सामुहिक कार्यवाही करण्याबाबत उपाययोजना करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासनाने पदपथ विक्रेते (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ लागू केलेला असून राज्य शासनाने, महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिध्द केलेले आहेत.

तद्नंतर सदर अधिनियमातील कलम ३८(१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियम) (महाराष्ट्र) योजना, २०१७ दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी योजना प्रसिध्द केली आहे. यानुषंगाने फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यवाही स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येत आहे.

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, रेल्वे स्थानकाबाहेर १५० मीटरच्या अंतरापर्यंत पदपथ व रस्ते मोकळे ठेवण्याबाबत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**वेल्हे (जि.पुणे) तालुक्याचे प्रवेशद्वाराजवळील पुणे-सातारा महामार्गालगत अपघात रोखण्याबाबत**

**(२) ५५६९२ (२४-०८-२०१६) श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हे (जि.पुणे) तालुक्याचे प्रवेशद्वार असलेल्या नसरापूर बाजारपेठेची चेलाडी फाटा, कौंढणपूर फाटा, वेळ फाटा, भोर फाटा व सारोळा फाटा हे पुणे-सातारा महामार्गालगत असल्याने येथे येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून हे ठिकाण अतिवर्दळीचे व गर्दीचे बनले आहे. सदरील सहापदरी महामार्ग ओलांडताना नेहमी अपघात होत असूनही याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने येथील प्रवासी व नागरीकांमध्ये संताप पसरल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अपघात रोखण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :** (१) या ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत असून सदर ठिकाण अतिवर्दळीचे व गर्दीचे बनले आहे. तथापि, या ठिकाणच्या महामार्गावर ठिकठिकाणी दिशादर्शक फलक लावून वाहतुकीच्या नियमनासाठी व पेट्रोलिंग करण्यासाठी वाहतूक पोलीस कर्मचारी नेमले जातात. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन कारणाऱ्यांवर मोटर वाहन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येते. त्यामुळे या परिसरातील नागरीकांमध्ये कोणत्याही प्रकारचे संतापाचे वातावरण पसरलेले नाही.

(२) पुणे ग्रामीण जिल्हा कार्यक्षत्रातून जाणाऱ्या पुणे-सातारा महामार्गावर कात्रज बोगदा ते सारोळा अशी हद्द पुणे ग्रामीण जिल्ह्यात येते. या महामार्गाचे सहापदीकरणाचे काम चालू आहे. महामार्गावर ठिकठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात आलेले असून वाहतुकीचे नियमन करण्यासाठी स्थानिक पोलीस स्टेशनकडून वाहतूक पोलीस कर्मचारी यांची गस्तीसाठी नेमणूक करण्यात येते. तसेच वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्याप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येते.

पुणे सातारा मार्गावर पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रात झालेल्या अपघातांची माहीती :-

| वर्ष | अपघात | मयत | जखमी |
|---|---|---|---|
| २०१४ | ८४ | ४७ | ८४ |
| २०१५ | ११६ | ५३ | १२२ |
| माहे ऑगस्ट, २०१६ पर्यंत | ५३ | ४२ | ६३ |

वि.स. ५२६ (३)

पुणे सातारा मार्गावर पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रात नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यांत आलेली आहे :-

| वर्ष | अवैध प्रवासी / ड्रंक ड्राईव्ह व इतर केसेस | एकूण दंड (रु.) |
|---|---|---|
| २०१४ | १२९३ | २९०६०० |
| २०१५ | १७६६ | ३८७१०० |
| माहे ऑगस्ट, २०१६ पर्यंत | २०८० | २५५९०० |

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**महाराष्ट्र सदन प्रकरणातील झोपडपट्टी पुनर्वसन योजना रद्द केल्यानंतर ही योजना हस्तगत करण्यासाठी काही विकासक दहशत निर्माण करत असल्याबाबत**

**(३) १०००३५ (३०-१२-२०१७) श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सदन प्रकरणातील झोपडपट्टी पुनर्वसन योजना रद्द केल्यानंतर ही योजना हस्तगत करण्यासाठी काही विकासकांनी दादागिरी सुरू केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी स्थानिक गुंडांच्या मदतीने झोपडपट्टीवासीयांमध्ये दहशत पसरवली जात असल्याची तक्रार झोपडपट्टीवासीयांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत विकासक व अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (७-१-२०१९) :** (१), (२) व (३) अंधेरी अन्नानगर शिवशक्ती (एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन पदाधिकारी यांच्या तक्रार अर्जावरून एल ॲण्ड टी कंपनीच्या सुरक्षारक्षक यांच्या विरूध्द अदखलपात्र गु.र.क्र. ११४५/१८ भा.दं.वि.स. कलम ५०६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांची अंबोली पोलीस ठाणेस बैठक आयोजित करून त्यांना शांतता राखण्याची समज देण्यात आलेली आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. ५२६ (४)

**राज्यातील मराठा समाजाच्या बेरोजगार तरुणांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४) १०९४०७ (२३-०४-२०१८) ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाच्या बेरोजगार तरुणांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राष्ट्रीयीकृत बँका व नागरी सहकारी बँकामार्फत दोन हजार कोटी रूपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे मा.सहकार मंत्री यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर कर्जाचा लाभ देत असताना १० ते ५० लाख रूपयापर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात येणार असून उक्त कर्जावरील व्याज हे शासन स्वत: भरणार असुन सदर महामंडळास ४०० कोटी रूपये निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना कार्यान्वीत होऊन त्याचा लाभ बेरोजगार तरुणांना होण्यासाठी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०१-२०१९) :**

(१) अंशत: खरे आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातुन मराठा बेरोजगार तरुणांना राष्ट्रीयकृत व नागरी सहकारी बँकांमार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्याची घोषणा मा.मंत्री (सहकार) यांनी केली आहे. मात्र रक्कमेचा उल्लेख केलेला नाही.

(२) व (३) राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणा-या व तशी क्षमता असणा-या तरुण वर्गाला आर्थिक सहाय्य पुरविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभागाच्या अखत्यारीतील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, व गट कर्ज प्रकल्प योजना या ३ योजना राबविण्यास दिनांक २१.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.. दि.३१.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये महामंडळाचे भागभांडवल रु.४००/- कोटीने वाढविण्यास मंजूरी देण्यात आली असून, त्यापैकी रु.७० कोटी इतका निधी शासन निर्णय दि.९.१०.२०१८ अन्वये वितरीत करण्यास अनुमती दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खुलताबाद (जि. औरंगाबाद) शहरात भंगार वेचणा-या बालकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५) १११७०६ (०७-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद (जि. औरंगाबाद) शहरात विविध ठिकाणी कचराकुंड्यातील प्लॉस्टीक, रद्दी, गोळा करुन उदरनिर्वाह करणाऱ्या लहान मुलांचे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मुलांना विषारी जीवजंतूमुळे संसर्गजन्य आजार जडले असुन स्फोटक वस्तूंमुळे अनेक बालकांना जीवही गमवावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने गंभीर दखल घेत त्यांना आर्थिक मदत करुन त्यांचे सामाजिक संस्थाच्या माध्यमातून पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१५-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही,
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर परिसरातील मिहानमध्ये उघोगांना अल्प दरात जमिनीचे वाटप करण्यात आल्याबाबत

**(६) ११३२९५ (२३-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील मिहान सेझ प्रकल्पात आतापर्यंत ७२ कंपन्यांना जागा देण्यात आल्या, त्यापैकी फक्त १४ कंपन्या कार्यरत आहेत, तसेच सेन्ट्रल फॅसिलिटी बिल्डींगमध्ये (सी.एफ.बी.) ३० कंपन्यांना मासिक भाडे तत्वावर देण्यात आलेल्या जागेसोबतच विशेष आर्थिक क्षेत्राबाहेरील ३३ कंपन्यांना जागा देण्यात आल्या, त्यापैकी फक्त १२ कंपन्या कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनासोबत झालेल्या करारानुसार नाममात्र दरात नॉनसेझमध्ये पतंजली समुहाला देण्यात आलेल्या २३४ एकर जमिनीचे कंपनीने पैसे भरले नसून उक्त जमीन ताब्यात घेतली नाही, तसेच कामास सुरूवातही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पतंजली कंपनीने एकूण किती एकर जमीन ताब्यात घेतली त्या संदर्भात किती पैसे शासनाकडे जमा केले आहे तसेच नागपूर शहरातील मिहान सेझ प्रकल्पात कोणकोणत्या कंपन्या कार्यरत आहेत, त्याद्वारे विदर्भातील व विदर्भाबाहेरील किती युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१९) :**(१) सद्यस्थितीत, नागपूर शहरातील मिहान येथील विशेष आर्थिक क्षेत्रात ७७ कंपन्यांना जागा देण्यात आलेली आहे व त्यापैकी १८ कंपन्या कार्यरत आहेत. सेंट्रल फॅसिलिटी बिल्डींगमध्ये ३४ कंपन्यांना मासिक भाडे तत्वावर जागा देण्यात आली आहे. तसेच, विशेष आर्थिक क्षेत्राबाहेरील ३८ कंपन्यांना जागा देण्यात आलेली आहे. त्यापैकी, १२ कंपन्या कार्यरत आहेत.
(२) पतंजली समूहाला देण्यात आलेली जागा ही ई-निविदा पदध्तीने देण्यात आलेली आहे. दोन वेळा ई-निविदा काढूनसुध्दा योग्य प्रतिसाद न मिळाल्याने तिसऱ्यांदा आलेल्या प्रतिसादानुसार पतंजली समूहाला २३४.१५ एकर जागा रु.६३०.०० प्रति चौ.मी. या दराने देण्यात आली आहे. या दरानुसार पूर्ण जागेसाठी रु.५९.६९ कोटी इतक्या रकमेचा भरणा पतंजली समूहाने केलेला असून प्रकल्पाच्या बांधकामाला सुरुवात केलेली आहे.
(३) पतंजली समूहाने विशेष आर्थिक क्षेत्रात १०६.११ एकर भूखंडासाठी ७४.०३ कोटी रुपयांचा भरणा केलेला आहे. तर, सेझ बाहेरील क्षेत्रात २३४.१५ एकर भूखंडासाठी ५९.६९ कोटी रुपयांचा भरणा केलेला आहे. एकूण ३४०.२६ एकर जागेसाठी १३३.७२ कोटी रुपयांचा भरणा केलेला आहे. मिहानमध्ये अंदाजे १२९९४ युवकांना प्रत्यक्ष व ६७००० युवकांना अप्रत्यक्ष रोजगार प्राप्त झालेला आहे. मिहान सेझ प्रकल्पात एअर इंडिया, सेनोस्फिअर इंडिया, डाएट फूड इंटरनॅशनल, हास कॉर्पोरेशन, एचसीएल, हेक्सावेअर बीपीएस, इंफोसिस, कणव ॲग्रोनॉमी, कोलँड डेव्हलपर्स, लुपिन, मेटाटेक एअरसिस्टीम, प्रवेश एक्सपोर्ट, स्मार्ट डेटा एंटरप्राइजेस, टीएअएल मॅन्युफॅक्चरिंग, टाटा कन्सलटन्सी, टेक महिंद्रा, रिलायन्स या कंपन्या कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई पोलीसांच्या महिला अत्याचार प्रतिबंधक शाखेत मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याबाबत

**(७) ११७७९२ (२६-०७-२०१८) श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत महिलांवर होणाऱ्या अत्याचारांची दखल घेऊन गुन्ह्यांचा तात्काळ तपास करुन पिडितेला न्याय मिळावा याकरिता राज्य शासनाने सन २०१३ मध्ये महिला अत्याचार प्रतिबंधक शाखेची स्थापना केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थापनेस ५ वर्षे उलटूनही शाखेतील मंजूर पदे बऱ्याच प्रमाणात अद्यापही रिक्त आहेत तसेच या विभागास पूर्णवेळ उपायुक्त नेमण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याने मुंबई पोलीसांच्या महिला अत्याचार प्रतिबंधक शाखेला सन २०१५ पासून अद्यापपर्यंत एकही गुन्हा सिध्द करता
आलेला नाही , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे रिक्त ठेवण्यामागची कारणे काय आहेत व ती भरणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्र. पीएडब्ल्यू -०११३/प्र.क्र.४/ विसा ६, दिनांक ०७/०२/२०१३ प्रमाणे ०१ पोलीस उप आयुक्त पद मंजुर केलेले असून सदर मंजुर पद पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या उपलब्ध ०१ पोलीस उप आयुक्त पदातून कार्यान्वित करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार पोलीस उप आयुक्तांची नेमणुक करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर शाखेत शासन निर्णयाप्रमाणे बृहन्मुंबई पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांची नेमणूक करण्यात येते.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर मंजूर असलेल्या पदांमधुन महिला अत्याचार प्रतिबंधक शाखेत पदे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था सक्षम करण्याबाबत

**(८) ११८९९० (३०-०७-२०१८) श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात दिवसेंदिवस वाढते अवैध धंदे, चो-या व दरोडे याबाबत कायदा व सुव्यवस्था सक्षम करण्यात यावी यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक व मालवणचे पोलीस निरिक्षक यांची भेट घेऊन त्यांच्याकडे वाढते अवैध धंदे तात्काळ बंद करावेत व तालुक्यातील जनतेच्या सुरक्षितेसाठी पोलीसांनी चोर व दरोडेखोर तसेच गुंडावर तात्काळ सक्त कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालवण शहरात जिल्हा नियोजन निधीतून बसवण्यात आलेली सीसीटीव्ही यंत्रणा बंद आहे, त्यामुळे चोरट्यांचा शोध घेणे अडचणीचे होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.स्थानिक लोकप्रतिनिधीनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही,

अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त नाही. तथापि मालवण पोलीस ठाणे अभिलेखावर माहे सप्टेंबर २०१८ पर्यंत गुन्ह्याची स्थिती खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आल्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| गुन्ह्याचा प्रकार | दाखल | उघड | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| मालमत्ता | १८ | १२ | ----- |
| चोरी | १४ | ८ | ----- |
| घरफोडी | ३ | ३ | ७ |
| दरोडा | १ | १ | ९ |

दारुबंदीच्या २३ केसेस दाखल असून त्यामध्ये एकूण १,४९,५३९/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. तसेच जुगार कायद्याखाली १६ केसेस दाखल करण्यात आल्या असून त्यामध्ये एकूण ३,५२,९७५ रु.किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

मालवण शहर समुद्र किनारी असून क्षारयुक्त व वादळी वाऱ्यांमुळे सी.सी.टी.व्हि यंत्रणा बंद पडते परंतु संबंधीताना वेळोवेळी बोलावून दुरुस्ती करण्यात येते.

(३) लेखी निवेदन प्राप्त नाही तथापि उपरोक्त प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. रात्रीची गस्त प्रभावीप्रमाणे करण्याकरीता योग्य ते निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांढरकवडा विभागामध्ये मोठ्या प्रमाणात सुरु असलेले अवैध धंदे**

**(९) ११९१९१ (३०-०७-२०१८) श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) विभागामध्ये अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू असल्याबाबत श्री.अमोल कोळी (उपविभागीय पोलीस अधिकारी), पांढरकवडा, जि.यवतमाळ यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२-१-२०१९) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ, यांच्याकडून सदर निवेदनाची सखोल चौकशी करण्यात आली आहे. पांढरकवडा उप विभागात अवैध धंद्याविरूध्द पोलीसांनी वेळोवेळी प्रभावी कायदेशीर कार्यवाही केली आहे. सदर चौकशीत कोणीही पोलीस अधिकारी दोषी असल्याचे आढळून आलेले नाही.

---

**पुणे-नाशिक महामार्गावरील वाकी खुर्द (ता.खेड, जि. पुणे) गावाच्या हद्दीत अल्पवयीन मुलीची झालेली हत्या**

**(१०) १२०११० (२५-०७-२०१८) श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-नाशिक महामार्गावरील वाकी खुर्द (ता.खेड, जि. पुणे) गावाच्या हद्दीत अल्पवयीन मुलीचा गळा आवळून हत्या करून मृतदेह रस्त्याच्या कडेला फेकून दिल्याची घटना दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास घडल्याचे निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पवयीन युवतीच्या खुनाबाबत अद्याप स्थानिक पोलीसांना गुन्हेगारांचा शोध लागला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हत्येतील गुन्हेगारांना शोधण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१२-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
सदर प्रकरणी चाकण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४५५/२०१८ भादंवि ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दिनांक १०/०५/२०१८ रोजी २२/५७ वा. दाखल करण्यात आला आहे.
(३) श्वानपथकाचा वापर, व्हिसेरा तसेच डी.एन.ए.सॅम्पल तपासणी, मोबाईल टॉवरचा डम्प डाटा मिळविणे, आजुबाजुचे गावांमध्ये दवंडी देणे व प्रसिध्दी पत्रके वाटणे, गुप्त बातमी मिळविणे इत्यादी प्रयत्नांसह पुणे शहर व बाहेरील जिल्हयातील इतर पोलीस स्टेशनला कळविण्यात आले आहे. तसेच ९८ साक्षीदार तपासण्यात आले आहेत. गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळवून गुन्हा उघडकीस आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ऊस तोडणी कामगारांच्या कल्याणासाठी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे ऊस कामगार महामंडळ स्थापन करण्याबाबत**

**(११) १२११२५ (२६-०७-२०१८) अ‍ॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ऊस तोडणी कामगारांच्या कल्याणासाठी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे ऊस कामगार महामंडळ स्थापन करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू महामंडळ स्थापन करण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदरहू महामंडळ किती कालावधीत स्थापन होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (९-१-२०१९) :**
(१) हे खरे आहे
(२) व (३) उसतोड आणि उस मालवाहतुक कामगारांकरीता स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याऐवजी असंघटित कामगारांच्या कल्याणाकरीता केंद्र शासनाने तयार केलेल्या असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ या कायद्यांतर्गत कै. गोपीनाथ मुंडे यांच्या स्मरणार्थ व नावाने उसतोड आणि उस मालवाहतुक कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना तयार करून या योजनेमध्ये या कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबियांकरीता शैक्षणिक, आरोग्य, गृहनिर्माण, घरकुल व तत्सम कल्याणकारी बाबींच्या समावेश करण्याच्या निर्णय दि. १०/१२/२०१७ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आलेला आहे.

त्यानुसार लोकनेते गोपीनाथ मुंडे उसतोड कामगार कल्याण योजनेचे कार्यालय कामगार कल्याण केंद्र परळी जि. बिड येथे दि. ३०/६/२०१८ रोजी सुरू केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे तंत्र व्यवसायांची संख्या वाढविण्याबाबत**

**(१२) १२२४३१ (३०-०७-२०१८) श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे तंत्र व्यवसायांची संख्या वाढविण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री महोदय यांना दिनांक २६ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पत्राची दखल घेवून शासनाने त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-१२-२०१८) :** (१) नाही.
तथापि यासंदर्भात मा. मंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण यांचे दिनांक १०.०४.२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.
(२) व (३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा क्षमता विस्तार आराखडा प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर क्षमता विस्तार आराखड्यामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोर या संस्थेची प्रवेशक्षमता १७३ ने वाढवून एकूण प्रवेशक्षमता ३८९ करण्यासाठी प्रस्तावित आहे.

---

**दौंड (जि. पुणे) येथे शासकीय कर्मचाऱ्याकडून झालेल्या गोळीबारात मृत्यु झालेल्या ३ व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणेबाबत**

**(१३) १२३९७८ (२६-०७-२०१८) श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि. पुणे) येथे दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी शासकीय कर्मचाऱ्याकडून झालेल्या गोळीबारात मृत्यु झालेल्या ३ व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी १५ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळण्याची मागणी मा.लोकप्रतीनिधिनी दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना शासकीय आर्थिक मदत देण्यासाठी स्वतंत्र कार्यवाही करण्याचे आश्वासन मा. मुख्यमंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मृत्यू झालेल्या ३ व्यक्तींच्या कुटूंबियांना प्रत्येकी १५ लाख रुपयांची मदत मिळवून देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृत व्यक्तींना प्रत्येकी रु.२.०० लाख इतकी आर्थिक मदत वितरित करण्यात आली होती. मा.लोकप्रतिनिधींच्या विनंतीच्या अनुषंगाने प्रत्येकी रु.१.०० लाख इतके अतिरिक्त अर्थसहाय्य दि.१३/११/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांना वितरीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवाळी (कल्याण,जि.ठाणे)येथिल नौदलाने संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीसंदर्भात झालेल्या आंदोलनात शेतकरी व भुमीपुत्रांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेणेबाबत**

**(१४) १२६३३७ (०३-०८-२०१८) श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवाळी (कल्याण,जि.ठाणे) येथील नौदलाने संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीसंदर्भात झालेल्या आंदोलनात शेतकरी व भुमीपुत्रांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे भिमा कोरे गावाच्या धर्तीवर मागे घेण्यास स्थानिक संघटनांनी शासनास निवेदन देवुन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अद्यापपर्यंत स्थानिक भुमिपुत्रांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) नेवाळी (कल्याण, जि. ठाणे) येथिल नौदलाने संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जागेसंदर्भात झालेल्या आंदोलनात शेतकरी व भूमीपुत्रांवर हिललाईन पोलीस ठाणे येथे अनुक्रमे गु.र.क्र. १७०/२०१७, गु.र.क्र. १७१/२०१७ व गु.र.क्र. १७२/२०१७ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. तसेच मानपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३५९/१७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

याबाबत पोलीस आयुक्त, ठाणे यांच्याकडून माहिती/ अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर त्यावर विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन सदर प्रकरण, गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीआरओ-०५१६/ प्र.क्र.१०६/विशा-२, दि. ३०.८.२०१६ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३२१ नुसार राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमिती समोर ठेवण्यात येईल.

---

## मुंबईतील भांडूप येथील एका तरुणाने बागेतील फुलझाडांच्या आड गांजाची लागवड केल्याबाबत

**(१५) १२७१४९ (०६-१२-२०१८) श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भांडूप येथील एका तरुणाने बागेतील फुलझाडांच्या आड गांजाची लागवड केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भांडुपच्या डोंगराळ भागातल्या विशेषतः संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेवरील वस्त्यांमध्ये गांजाची लागवड सहजतेने होत असल्याचेही निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंबईमध्ये अंगमेहनतीची कामे करणाऱ्या वर्गातून गांजाची प्रचंड मागणी पुर्ण करण्यासाठी याच भागातून गांजा उपलब्ध करून दिला जात असल्याचेही निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार गांजाची लागवड करणाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याबाबत तसेच गांजा सारख्या अंमली पदार्थाची लागवड रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) भांडुप येथील एका इसमाने गांजाच्या दोन रोपट्याची लागवड केल्याप्रकरणी भांडुप पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५०/२०१८ कलम ८ (क), २० (अ) (ब), एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

भांडुपच्या डोंगराळ भागातल्या विशेषतः संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेवरील

वस्त्यांमध्ये व इतरत्रसुध्दा विशेष पथक, निगरानी पथक, बिट अधिकारी/अंमलदार याची गस्त ठेवण्यात आली आहे. तसेच, गुप्त बातमीदारांना ही माहिती देवून असे कोणी गांजाची लागवड करीत असल्यास पोलीसांना कळविण्याबाबत त्यांना सूचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरणच्या ( जि. रायगड ) मार्क्स इंडिया प्रा.लि. कंपनीने आपले तीन प्रकल्प बंद करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१६) १२७१६३ (१०-१२-२०१८) श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरणच्या (जि. रायगड) मार्क्स इंडिया प्रा.लि. कंपनीने केंद्र शासनाच्या डीपीडी धोरणाचा आधार घेत आर्थिक नुकसानीमुळे आपल्या तीन प्रकल्पांना टाळे लावण्याचा माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे सुमारे ९०० कामगार बेरोजगार होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कंपन्या बंद होऊ नये म्हणून शासनाने कोणती सकारात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-०१-२०१९) :** (१) व (२) अशंत: खरे आहे.
मे.एम.पी.एम.टर्मीनल्स इंडिया प्रा.लि. (पुर्वीचे नाव मार्क्स इंडिया प्रा.लि.) या आस्थापनेच्या तीन युनिट पैकी प्लॉट नं.१००, ब्लॉक-५,सेक्टर-२, द्रोणागिरी वेअर हाउसिंग कॉम्प्लेक्स,नवी मुंबई-४०० ७०७ या युनिटमध्ये दि.१२.१०.२०१८ पासुन टाळेबंदी लागू होणार असल्याचे व्यवस्थापनाने दिनांक २९/०९/२०१८ रोजीच्या नोटीसद्वारे कळविले होते.सदर युनिटमधील सुमारे ५९३ इतके अधिकारी / कर्मचारी, कायम व कंत्राटी कामगार टाळेबंदी नोटीसीमुळे प्रभावित होणार होते.
(३) सदर युनिटमध्ये दिनांक १२/१०/२०१८ पासुन लागू होणा-या टाळेबंदी संदर्भात कंपनी व्यवस्थापन,स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीस आयुक्त / उप आयुक्त आणि कंत्राटदार प्रतिनिधी यांच्या संयुक्त बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याने दिनांक २९/०९/२०१८ रोजीची टाळेबंदी नोटीस व्यवस्थापनाने मागे घेतली आहे. सद्यस्थितीत कंपनीचे कामकाज पुर्ववत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथील घाटकोपर येथे एका राजकीय पक्षाच्या सदस्याने**
**मुली व महिलांच्या संदर्भात केलेले वादग्रस्त विधान**

**(१७) १२७३७५ (०७-१२-२०१८) श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील घाटकोपर येथे एका राजकीय पक्षाच्या सदस्याने दही हंडीचा उत्सव सुरु असताना दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास मुली व महिलांच्या संदर्भात वादग्रस्त व अपमानास्पद विधान केल्यामुळे राज्यात सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सदस्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी व राज्यातील महिलांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनातर्फे चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नूसार संबंधीत सदस्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणी सरकारी अभियोक्ता यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तक्रारदारांनी सदर लोकप्रतिनिधीविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन घाटकोपर पोलीस ठाणे येथे गु.नो.नं. ४७७७/२०१८ कलम ५०४ भा.दं.वि. प्रमाणे अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी मा.महानगर दंडाधिकारी, ४९ वे न्यायालय, विक्रोळी, मुंबई यांनी फौ.दं.प्र.सं. कलम १५५ (२) प्रमाणे तपास करण्यास परवानगी दिलेली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे होमगार्डच्या धर्तीवर ट्रॅफिक वार्डन योजना सुरु करण्याबाबत**

**(१८) १२७४१७ (०७-१२-२०१८) श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई, पुणे, नांदेड, जळगाव या शहरांमध्ये सन २००४ मध्ये ट्रॅफिक वार्डन योजना सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु योजनेचे स्वरूप काय आहे,

(३) तसेच, नाशिक शहरामध्ये सदरहू योजना सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली असून सदरहु योजना सुरु करण्याच्या दृष्टीने दिनांक १२ जुन, २०१६ व दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे अध्यक्षतेखाली बैठकी देखील पार पडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, सदरहु बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने ट्रॅफिक वार्डन योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :** (१) मुंबई शहरामध्ये ट्रॅफिक वार्डन योजना सुरु आहे.

पुणे शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्याकरीता वाहतूक पोलीसांच्या मदतीस पुणे जिल्हा सुरक्षा मंडळाकडून मदतनीस पुरविण्यांत येत होते. परंतु सदरची सेवा माहे ऑगस्ट, २०१७ पासून खंडीत आहे.

नांदेड शहरात माहे मे, १९९९ पासून ट्रॅफिक वार्डनची सेवा सुरु करण्यात आली होती. सध्या सदर सेवा खंडीत आहे.

जळगांव जिल्ह्यात सन २००२ पासून ट्रॅफिक वार्डन सेवा सुरु करण्यांत आली होती. सदर सेवा सन २०१४ पासून संपुष्टात आलेली आहे.

(२) वाहतूकीचे नियमन करण्यासाठी मनुष्यबळ कमी पडत असल्याने महानगरपालिका अस्तित्वात असलेल्या ठिकाणी महानगरपालिकानिहाय तर इतर ठिकाणी जिल्हानिहाय ट्रॅफिक योजना सुरु करण्यांत यावी व वॉर्डनला होमगार्डप्रमाणे मानधन देण्यांत यावे अशी योजना प्रस्तावित होती. परंतु त्यास अद्यापपर्यंत मुर्त स्वरुप देण्यांत आलेले नाही.

मुंबईमध्ये सध्या विविध ठिकाणी मेट्रो रेल्वेची कामे सुरु असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मेट्रो रेल प्राधिकरणाने वाहतुकीचे नियमन करण्यासाठी वार्डन पुरविलेले आहेत. त्यांचे मानधन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि मेट्रो रेल प्राधिकरण यांचेमार्फत अदा करण्यांत येते.

(३) हे खरे आहे.
(४) दिनांक २६.०९.२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशांनुसार, पोलीस महासंचालक कार्यालय, होमगार्ड समादेशक आणि नगर विकास विभागाकडून अभिप्राय मागविण्यांत आले होते. सदर अभिप्राय प्राप्त झाले आहेत. प्राप्त अभिप्राय लक्षात घेऊन पुढील कार्यवाही करण्यांत येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एचडीएफसी बँकेचे उपाध्यक्ष श्री.सिध्दार्थ संघवी यांची झालेली हत्या**

**(१९) १२७६६२ (०६-१२-२०१८) डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एचडीएफसी बँकेचे उपाध्यक्ष श्री.सिध्दार्थ संघवी हे दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी पासून बेपत्ता असून त्यांची हत्या झाल्याचे प्रकरण निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाचा तपास करून हत्येतील आरोपींना पोलीसांनी अटक केली आहे काय, त्यांची नावे काय आहेत व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ना. म. जोशी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १३३/२०१८ भा.दं.वि. कलम ३६४, ३६४ (अ), ३६५, ३९७, ३०२ व २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपी सर्फराज शाहिद शेख याला अटक करण्यात आली असून आरोपीविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथील महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाचे कार्यालय बेलापूर (नवीमुंबई) येथे स्थलांतरीत करण्याबाबत**

**(२०) १२७६९२ (१०-१२-२०१८) डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाचे कार्यालय नवी मुंबईतील बेलापूर येथे स्थलांतरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष पद आणि तीन सदस्यांची पदे अनेक कालावधीपासून रिक्त असतांना उक्त निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कार्यालयाच्या इमारतीला यापूर्वी शासनाने मुंबई उपनगरातील व शहरातील बांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, कलिना कॅम्पस्, वरळी डेअरी, वांद्रयाची शासकीय वसाहत, मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे जवळील जुन्या बॅरेक्सची जागा देण्याचा निर्णय झाला होता, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच सन २०१० मध्येही तत्कालीन शासनाने उक्त कार्यालय बेलापूरला नेण्याचा प्रस्ताव रद्द केला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे व तद्नुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याबाबत या विधानपरिषद सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने गठीत केलेल्या अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या एक सदस्य समितीने अ) माझगाव येथील विक्रिकर भवन इमारत येथील ब) चेंबुर, मुंबई येथील सर्व्हे क्र. ४६९, क) सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथील कोकण भवनच्या शेजारी बेलापूर रेल्वे स्टेशन शेजारी अंदाजे १०,००० चौ.मी. चा भूखंड या तीन जागांचा पर्याय उपलब्ध करून दिला. त्यानुसार दिनांक ४ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयानुसार सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील कोकण भवनच्या शेजारील प्लॉट क्र. ७ सेक्टर १० येथील १०००० चौ.मी. च्या भुखंडामधील मेट्रो प्रकल्पाला दिलेली सुमारे २००० चौ.मी. जागा वगळता उर्वरित जागा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी देण्यात आली आहे.

(२), (३) , (४), (५) व (६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या जागेच्या अनुषंगाने प्रश्नाच्या चर्चेच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या आश्वासनानुसार प्रधानसचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयास जागा उपलब्धतेसाठी एक समिती नियुक्त केली सदर समितीने आयोगाच्या कार्यालयास जागा उपलब्धतेसाठी १. वांद्रा - कुर्ला संकुल, २. महाराष्ट्र नेचर पार्क ३. चेंबूर मुंबई सर्व्हे क्र. ४६९ (अ), ५. सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई येथील कोकण भवन जवळील जागा ६. वरळी दुग्धशाळा परिसराची जागा, ७. मरीन ड्राईव्ह बॅरेक्सची जागा ८. माझगांव येथील विक्रिकर भवन इमारत जागा इत्यादी पर्यायांचा अभ्यास करण्यात आला.

त्यासंबंधी शासनाने प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने सुचविलेल्या पर्यायांपैकी सीबीडी बेलापूर येथील जागा दिनांक ४ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी देण्यात आली आहे.

तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयात दि. १६.८.२०१० रोजी झालेल्या बैठकीत त्यावेळी उपलब्ध करून दिलेल्या सीबीडी बेलापूर येथील जागेऐवजी वांद्रे शासकीय वसाहतीच्या पुर्नविकासाने उपलब्ध होणारी जागा, कलीना सांताक्रुझ व एमआयाडीसी अंधेरी येथील जागेपैकी सुयोग्य पर्याय निवडून तसा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे सुचविले होते.

---

## नाशिक जिल्हयात दुध दरवाढीकरिता केलेल्या आंदोलनातील शेतकऱ्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याबाबत

**(२१) १२७८५३ (०७-१२-२०१८) श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात दुध दरवाढीकरिता केलेल्या आंदोलनातील शेतकऱ्यांवर चुकीचे गुन्हे दाखल करून त्यांस अटक करण्यात आल्याची बाब दिनांक २२ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घेऊन त्यांची तत्काळ सुटका करावी अशी मागणी नाशिक जिल्हा शेतकरी आंदोलन समितीने मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे दिनांक २० जुलै , २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :** (१) अपर जिल्हादंडाधिकारी, नाशिक यांचा जमावबंदी आदेश लागु असताना पूर्व परवानगी न घेता रास्ता रोको आंदोलन करुन रस्त्यावरील गाड्या अडवून जमावबंदीचे उल्लंघन केल्यामुळे जायखेडा व सिन्नर पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक व सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता कार्यालयाकडुन स्वयंस्पष्ट अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) निरंक

---

## समांतर आरक्षणामध्ये माहे ऑगस्ट २०१४ पूर्वी प्रमाणे मागासवर्गीय गुणवत्ताधारक उमेदवारांची नियुक्ती करणेबाबत

**(२२) १२७९७४ (१०-१२-२०१८) श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय महिला, खेळाडू इ. समांतर आरक्षणाच्या उमेदवारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अपात्र ठरविल्यासंदर्भातील अन्यायकारक निर्णयांबाबत हायकोर्टाने अनेक उमेदवारांच्या बाजूने निर्णय दिल्याने ते निर्णय शासनाने इतर सर्व उमेदवारांना लागू करावे अशी मागणी मा. लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ तसेच दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वीत करण्याबाबतच्या कार्यपद्धतीबाबतचे शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजीचे परिपत्रक रद्द करून सुधारीत परिपत्रक जारी करण्याच्या मा.मंत्री सामाजिक न्याय यांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या बैठकीत सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१९) :** (१) दिनांक ७.८.२०१८ व दिनांक ५.९.२०१८ रोजीची निवेदने प्राप्त झाली आहेत.
(२) मा.मंत्री,सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७.८.२०१८ रोजी "मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेसाठी मागासवर्गीय आरक्षण व समांतर आरक्षणबाबत तसेच पोर्टलवर अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींबाबत" बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत दि.१३.८.२०१४ रोजीच्या परिपत्रकात सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(३) दि.१९.१२.२०१८ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये दि.१३.८.२०१४ रोजीच्या परिपत्रकातील (अ) प्रथम टप्पा मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर येथील करविरनिवासिनी अंबाबाई मंदिरात सरकारी पूजाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली नसल्याबाबत

**(२३) १२८३३२ (०५-१२-२०१८) श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील करविरनिवासिनी अंबाबाई मंदिरातील परंपरांगत पूजारी हटवून सरकारी पगारी पुजारी नियुक्त करण्याबाबत शासनाने कायदा करुनसूध्दा अद्यापही या मंदिरात सरकारी पूजाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, नवरात्रीच्या काळात मंदिरात देशभरातून सुमारे २० लक्ष भाविक दर्शनासाठी येत असून ९ दिवस मंदिरात उत्सव साजरे होत असल्यामुळे या मंदिरात पगारी पुजाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) श्री करवीर निवासीनी देवस्थानकडे सरकारी पुजारी नियुक्त करणेबाबत पूर्व तयारी सुरु आहे.
(३) सरकारी पुजारी नेमण्यासंदर्भात शासन स्तरावर वेळोवेळी बैठकी आयोजित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशी पोलीस स्टेशनतंर्गत (जि.उस्मानाबाद) काही पोलिसांनी एका दाम्पत्यास अमानुष मारहाण केल्याबाबत**

**(२४) १२८५०७ (०७-१२-२०१८) श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा उस्मानाबाद येथील वाशी पोलीस स्टेशन अंतर्गत काही पोलिसांनी चौकशीसाठी एका दाम्पत्याच्या घरी जाऊन त्यांना अमानुष मारहाण केल्याची घटना दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेच्या व पोलिसांच्या दंडेलशाही विरोधात गोर सेना सामाजिक संघटनेच्या वतीने राष्ट्रीय महामार्गावर दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास पोलीस मुर्दाबाद अशा घोषणा देत तब्बल १ तास रस्ता रोको करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दाम्पत्याविरुद्ध कोणत्या गुन्हयात एफआयआर नोंदविला आहे,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार अधिकार कक्षेबाहेर जाऊन मारहाण व दंडेलशाही करणाऱ्या संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) गोर सेना सामाजिक संघटनेच्या वतीने तेरणा कॉलेज टी पॉईंट उस्मानाबाद येथे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी २० मिनिटे रास्ता रोको करण्यात आला.
(३) दि.०३/०९/२०१८ रोजी चौकशीदरम्यान पोलीस उपनिरीक्षक यांचे अंगावर दगड घेवुन धावून आल्याने तसेच उध्दटपणाचे वर्तन करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यावरून एका इसमाविरूध्द एन.सी.क्र.७/२०१८ कलम ११०, ११७ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. सदर इसम व त्याच्या पत्नीस शिवीगाळ अथवा मारहाण करण्यात आलेली नाही. त्याला समज देवुन त्याच दिवशी सोडून देण्यात आले.
(४) या प्रकरणाच्या चौकशी अहवालामध्ये सदर दाम्पत्यास मारहाण झाली नसल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्रावरून निष्पन्न झाले आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

**परभणी येथील श्री. गणेश वेद पाठशाळेतील ३ अल्पवयीन मुलांचे लैंगीक शोषण केल्याबाबत**

**(२५) १२८९३४ (१०-१२-२०१८) डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील श्री. गणेश वेद पाठशाळेत वेदशास्त्रसंपन्न विषयाचे शिक्षण घेणाऱ्या ३ अल्पवयीन मुलांचे संस्थाचालकांच्या नातेवाईकांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लैंगीक शोषण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार संबंधीतांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०१९) :** (१) सदर घटना दि. २६/०८/२०१८ ते दि. १२/०९/२०१८ चे ०९.३० वा. दरम्यान घडलेली आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून नवामोंढा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२७४/२०१८ कलम ३०७,३२६,३२४,३२३,५०६,३४ भादवि, कलम४,७ रॅगिंग प्रतिबंधक कायदा, कलम ७,८,११(२), १२,१६, १७,२१ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, कलम २३ बाल न्याय अधिनियम प्रमाणे आरोपी क्र.१ व विधी संघर्षग्रस्त बालक क्र. २ व ३ यांचेविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. दाखल गुन्हयातील आरोपी क्र. १ यास अटक करण्यात येवून विधी संघर्षग्रस्त बालक क्र. २ व ३ यांना ताब्यात घेण्यात आले. विधी संघर्षग्रस्त बालक क्र. २ व ३ यांना मा. बाल न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता मा. न्यायालयीन दिलेल्या आदेशान्वये त्यांना रिमांड होम येथे दाखल करण्यात आले. सध्या आरोपी क्र. १ यांस मा. न्यायालयाच्या आदेशान्वये जामीन मंजुर केला आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा पोलीस तपासावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील शरणपूर रोडवरील स्नेहबंधन पार्क पोलीस अधिकारी, कर्मचारी वसाहत धोकादायक स्थितीत असल्याबाबत**

**(२६) १२९०३४ (०६-१२-२०१८) श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील शरणपूर रोडवरील स्नेहबंधन पार्क पोलीस अधिकारी वसाहतीतील इमारतीस तडे गेले असुन इमारतीच्या मागील काही भाग खचला आहे, पाण्याच्या टाक्या फुटल्या असल्याने दुषित पाणी पुरवठा होत असल्याने ही वसाहत धोकादायक स्थितीत असल्याची बाब दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय घरात राहत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून देखभाल दुरुस्ती खर्च घेण्यात येतो मात्र अनेक दिवसांपासून या वसाहतीतील घरांची दुरूस्तीच न करण्यात आल्याने पोलीस अधिकारी, कर्मचार्यांना या वसाहतीत राहणे अडचणीचे झाले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतींची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी संबंधित पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक आणि मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदने देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :**(१), (२), (३) व (४) “स्नेहबंधन पार्क” पोलीस वसाहत, नाशिक, येथील ६० अधिकारी निवासस्थाने व १६० कर्मचारी निवासस्थाने यांची दुरूस्ती करण्यासाठी ▯२,८२,०५,७७८/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता दिली असून उक्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागास वितरित करण्यात आला आहे. त्यानुसार दुरूस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे.

उक्त वसाहतीतील सर्व सदनिकांना पुरेसा व चांगला पाणीपुरवठा केला जात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-पुणे महामार्गवर मोटरसायकला बंदी असतांना मोटरसायकलस्वार या महामार्गाचा उपयोग करीत असल्याबाबत**

**(२७) १२९१२५ (०७-१२-२०१८) श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे महामार्गावर मोटरसायकला बंदी आहे तरीही या महामार्गावर मोटरसायकल चालविण्यात येत असुन गत सात महिन्यांत २ हजार ८११ मोटरसायकलस्वारांना कारवाईला सामोरे जावे लागले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-पुणे महामार्गवर सहा पदरी आणि ९४ किमी लांबीचा आहे या मार्गामुळे पावसाळ्यात प्रवासाचा वेळ वाचतो, या मार्गावर चारचाकी वाहने अती वेगाने जात असल्याने मोटरसायकल वाहकांना येथून जाण्यास मनाई आहे मात्र परवानगी नसतानाही मोटरसायकलस्वार प्रामुख्याने टोलनाका, पेट्रोल पंप, फुडमॉलमध्ये काम करणारे कर्मचारी याचा वापर करीत असल्याने त्यांच्या सोबत इतर वाहनातील प्रवाशांचा जीव धोक्यात येत असतो हे लक्षात घेता शासनाने याबाबत कोणती आवश्यक ती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१९) :** (१) मुंबई पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर मोटारसायकलस्वारांना मार्गक्रमण करण्यास बंदी आहे. परंतु मुंबई पुणे लेनवर कि.मी. क्र. ४२/००० ते कि.मी. क्र. ४८/१०० (खंडाळा एक्झीट) आणि पुणे मुंबई लेनवर कि.मी. ४४/८०० ते कि.मी. क्र. ३९/९०० (खोपोली एक्झीट) यादरम्यान मोटारसायकलस्वारांना परवानगी आहे.

मार्गक्रमण करण्यास बंदी असलेल्या ठिकाणी मोटारसायकलस्वार येत-जात असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यांत येते. माहे जानेवारी, २०१८ ते माहे जुलै, २०१८ या कालावधीत एकूण १,९२९ मोटारसायकलस्वारांवर कारवाई करुन रु.३,८६,८००/- इतका दंड वसूल करण्यांत आला आहे.

(२) मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर मोटारासायकलस्वारांना मार्गक्रमण करता येऊ नये म्हणुन पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यांत आलेल्या आहेत :-

• द्रुतगती मार्गावर दोन्ही लेनवर सर्वत्र क्रॅश बॅरीयर बसविण्यांत आलेले आहेत. त्यामुळे मोटारसायकल द्रुतगती मार्गावर आणता येत नाही.

• द्रुतगती मार्गावर मोटारसायकल अवैधरित्या येऊ नये याकरीता ६ फिक्स पॉईंट नेमून त्या ठिकाणी पोलीस कर्मचारी नेमण्यांत आले आहेत.

• द्रुतगती मार्गावर आपले कामगार/मालक व मॉलसंबंधी व्यक्ती यांच्या मोटारसायकल मिळून आल्यास त्यांच्या आस्थापनांचे परवाने रद्द करणेबाबत कार्यवाही करण्यांत येईल अशा आशयाच्या नोटीसा फुडमॉल व त्यामधील आस्थापना यांचे मालक व पेट्रोलपंपमालक, व्यवस्थापक यांना बजावल्या आहेत.

• द्रुतगती मार्गावर दोन्ही बाजूस तार कंपाऊंड करण्यांत आले आहे.

• द्रुतगती मार्ग सुरु होण्याचे ठिकाणी व मार्गाला बाह्य मार्गावरुन येणारे जॉईंट व एक्झीट या ठिकाणी मोठ्या अक्षरात दुचाकी वाहनास प्रवेशबंदीचे फलक लावण्यांत आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुकाने व छोटे उद्योग व्यवसायातील कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळणेबाबत**

**(२८) १२९४६२ (१०-१२-२०१८) श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्थीचे विनियम) अधिनियम, २०१७ अन्वये दुकाने, छोटे उद्योग व व्यवसायातील कर्मचाऱ्यांना मिळणारे संरक्षण हिरावून घेतल्याने कामगारांचे अस्तित्व धोक्यात आल्याची भावना बळावली असल्याची बाब दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजीपासून महाराष्ट्र दुकाने व आस्थापना या नव्या कायद्याने नऊ कामगार संख्या असलेल्या व्यवसायांमधील कामगारांचे संरक्षण हटविण्यात आल्याने त्यांना तक्रार करण्याचा हक्क राहिलेला नसल्याने या कायद्याचा फेरविचार करण्याची मागणी जोर धरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार तसेच छोटे उद्योग व्यवसाय यांवर होणारा प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी याबाबत शासन फेरविचार करणार काय,
(४) नसल्यास, कामगारांच्या रास्त तक्रारींचे निवारण करण्यासाठी दखल घेणारी यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.दिनांक १४/०८/२०१८ रोजी दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये कामगारांचे अस्तित्व धोक्यात या शीर्षकाखाली बातमी प्रसिध्द झाली होती.
(२) हे अंशतः खरे आहे.महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ च्या तरतूदी १० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांना देखील लागू करण्याबाबत मुंबई गुमास्ता युनियन, मुंबई यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक ११५९/२०१८ दिनांक १९/०१/२०१८ रोजी दाखल केली आहे.
(३) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) १० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांना औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या तरतूदी अन्वये दाद मागण्याची मुभा आहे. तसेच, १० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनेतील कामगारांना किमान वेतन अधिनियम, १९४८, समान वेतन अधिनियम, १९७६ ,औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम १९२३ (काही प्रकारचे काम करणा-या कर्मचा-यांना लागू होतो.) बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ इत्यादी कामगार कायदे लागू होतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-मुरबाड रोडवली बंगलो प्रोजेक्टमध्ये एका व्यावसायिकाची झालेली फसवणूक**

**(२९) १२९५०३ (०७-१२-२०१८) श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-मुरबाड रोडवली बंगलो प्रोजेक्टमध्ये गुंतवणूक केल्यास दहा बंगले आणि चांगला नफा देण्याची बतावणी करून ठाण्यातील कोलशेत येथील एका व्यावसायिकाची रुपये एक कोटी २० लाखांची फसवणुक केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून अद्यापपर्यंत किती जणांना अटक करण्यात आली आहे, तसेच त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यात 'सागाव परिसर विविध कार्यकारी सेवा संस्था' स्थापन करतांना बनावट स्वाक्ष-या केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याबाबत

**(३०) १२९६६४ (०७-१२-२०१८) श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यात 'सागाव परिसर विविध कार्यकारी सेवा संस्था' स्थापन करतांना मृत सदस्यांच्या नावाचा समावेश व काही व्यक्तिंच्या बनावट स्वाक्ष-या केल्याप्रकरणी संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांच्यासह सदस्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश मा.उल्हासनगर न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या आदेशानुसार सागाव परिसर विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या मुख्य प्रवर्तक व इतर सदस्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, गुन्हे दाखल करण्यात आलेल्यांमध्ये सनदी अधिकारी आणि एमएमआरडीएचे महानगर आयुक्त यांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही, असे कोणतेही आदेश मा. उल्हासनगर न्यायालयाने दिलेले नाहीत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सर्वच धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णालयाच्या नावातील फलकामध्ये 'धर्मादाय रुग्णालय' असे सुस्पष्टपणे लिहिण्याबाबत

**(३१) १२९६७२ (११-१२-२०१८) श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक पंचतारांकित धर्मादाय रुग्णालये ही रुग्णालयाच्या फलकावर धर्मादाय अथवा चॅरिटेबल असा शब्द लिहित नसल्यामुळे ख-या गरीब व गरजू वंचित रुग्णांना या रुग्णालयांमध्ये उपचाराचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ४३० धर्मादाय रुग्णालये असून त्यापैकी मुंबईत ७४ धर्मादाय रुग्णालये आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व धर्मादाय रुग्णालये असूनही तेथे गरीब रुग्णांना उपचार मिळत नसल्याने सर्व धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णालयाच्या नावातील फलकामध्ये 'धर्मादाय रुग्णालय' असे सुस्पष्टपणे लिहावे असे आदेश धर्मादाय आयुक्तांनी काढले असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे येथील धर्मादाय आयुक्तांनी येथील सर्व धर्मादाय रुग्णालयांना रुग्णालयाच्या नावापुढे धर्मादाय हा शब्द लावणे बंधनकारक करण्याचे आदेश माहे सप्टेंबर २०१८ वा त्यासुमारास दिले असुन पुणे जिल्ह्यातील किती रुग्णालयांनी त्यांच्या नावापुढे धर्मादाय असा शब्द लिहिला आहे,

(५) असल्यास, रुग्णालयाच्या नावातील फलकामध्ये 'धर्मादाय रुग्णालय' असे सुस्पष्टपणे लिहावे या आदेशाची अंमलबजवणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच अंमलबजाणी न करणा-या आतापर्यंत किती रुग्णांलयावर कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१९) :** (१) नाही.

(२) राज्यात साधारणत: ४३० धर्मादाय रुग्णालये असून त्यापैकी मुंबईत ७५ धर्मादाय रुग्णालये आहेत.

(३) होय. यासंदर्भात धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि १९/०७/२०१८ रोजी कार्यालयीन परिपत्रक निर्गमित केले आहे.

(४) धर्मादाय सह आयुक्त, पुणे कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या ५७ पैकी ५६ धर्मादाय रुग्णालयांनी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि. १९/०७/२०१८ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे 'धर्मादाय' अथवा 'चॅरिटेबल' हा शब्द रुग्णालयाच्या नावासमोर लावलेला आहे.

(५) राज्यातील धर्मादाय संघटनेच्या अधिपत्याखालील सर्व जिल्हा कार्यालय प्रमुखांना धर्मादाय रुग्णालयांनी त्यांचे नावांत अथवा नावासमोर "धर्मादाय" अथवा "चॅरिटेबल" असे नमूद करणेबाबतच्या उपरोक्त परिपत्रकाच्या अंमलबजावणीकरीता आवश्यक निर्देश देण्यात आले असून, त्यानुसार, ३४ जिल्ह्यांपैकी २१ जिल्ह्यांनी पूर्ततेबाबत अहवाल सादर केलेला आहे. १३ जिल्ह्यांनी अंशत: पूर्ततेबाबत अहवाल सादर केलेला आहे. सदर १२ जिल्हा कार्यालय प्रमुखांना परिपत्रकाची अंमलबजावणी न करणाऱ्या त्यांचे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांविरुद्ध नियमानुसार पुढील कार्यवाही/ कारवाई करणेकरीता निर्देशित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नवी मुंबईतील कल्याण-नावडे मार्गावर पोलीस शिपायाचा ट्रेलरखाली येऊन झालेला मृत्यु

**(३२) १३०१५८ (०६-१२-२०१८) डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कल्याण-नावडे मार्गावर बुधवारी पहाटे तीन वाजता झालेली वाहतूक कोंडी काढल्यानंतर तळोजा वाहतूक शाखेत दुचाकीवरून परत येत असताना पोलीस शिपाई श्री.अतुल गागरे यांना ट्रेलरने चिरडल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार ट्रेलर चालकावर कारवाई करण्याबाबत तसेच मृत पोलीस शिपायाच्या कुटुंबियास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१२-२०१८) : (**१) हे खरे आहे.

सदरची घटना दिनांक ०५.०९.२०१८ रोजी घडली आहे.

(२) तळोजा एमआयडीसी बायपास कल्याण येथे वाहतूक कोंडी झाली असल्याचा संदेश प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी वाहतूक शाखेतील नमूद पोलीस शिपाई हे त्यांच्या मोटारसायकलने सदर ठिकाणी वाहतूक कोंडी मोकळी करण्याकरीता गेले होते. वाहतूक कोंडी मोकळी करुन त्यांचे मूळ ठिकाणी परत जात असतांना एका अज्ञात वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला मागील बाजूने धडक दिल्याने झालेल्या अपघातात नमूद पोलीस शिपाई हे मृत्युमुखी पडले.

यावप्रकरणी तळोजा पो.स्टे. येथे दिनांक ०५.०९.२०१८ रोजी गु.र.क्र. २२१/१८, भा.दं.वि. कलम ३०४, २७९, मो.वा.का. कलम १८४ व १३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यांत आला आहे.

आरोपी वाहनचालक यास दिनांक १०.०९.२०१८ रोजी अटक करण्यांत आली असून गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे. मृत पोलीस शिपायाच्या कुटुंबास आर्थिक मदत देण्याकरीता मोटार वाहन दावा न्यायाधिकरण, अलिबाग यांचेकडे दावा दाखल करण्यांत आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आर्थर रोड कारागृहात दोन आरोपींचा कोठडीत मारहाणीमुळे झालेला मृत्यु

**(३३) १३०८५० (०८-१२-२०१८) ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई स्थित धारावी येथील रहिवाशी तसेच कलम ३२४ (दि.९ सप्टेंबर) अन्वये वांद्रे पोलीस ठाणेतर्फे अटक केलेला आरोपी श्री. फिरोज शेख यास आर्थर रोड कारागृहातील कोठडीत जबर मारहाणीनंतर बेशुद्ध अवस्थेत दिनांक २४ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास उपचारासाठी जे.जे.रुग्णालयात दाखल केल्यानंतर तो त्याच दिवशी संध्याकाळी मृत्यू पावला,

त्याचे नातेवाईकांनी कास्टोडीयल डेथचा आरोप करीत माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मा. राज्यमंत्री (गृह-शहरे), मा.अध्यक्ष (राज्य मानवी हक्क आयोग) यांच्याकडे लेखी निवेदन सुपूर्द करून उच्चस्तरीय न्यायिक चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. फिरोज शेख याच्या मृत्युची बातमी पोलिसांकडून त्याचे कुटुंबातील लोकांना वेळेत कळविण्यात न आल्याने त्याचा मृतदेह सदर रुग्णालयाचे शवागारात दिनांक २५,२६,२७,२८ सप्टेंबर २०१८ अर्थात ४ दिवस पडून असल्याचे तसेच पोलिसांची बेजबाबदार वृत्ती दर्शवणारी गंभीर बाब निर्दशनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच,राज्यातील मुंबई स्थित चिता कॅम्प ट्रोम्बे, देवनार, मुंबई-८८ येथील रहिवाशी तसेच कलम ३९२ (दि.१७ सप्टेंबर) अंतर्गत पवई (रामबाग) पोलीस ठाणेतर्फे अटक केलेला आरोपी मो.अनवर मो.खालिद सय्यद यास सदरहु पोलीस ठाण्याचे कोठडीत व नंतर आर्थर रोड कारागृहाच्या जेल कोठडीत जबर मारहाणीनंतर बेशुद्ध अवस्थेत दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास उपचारासाठी जे.जे.रुग्णालयात दाखल केल्यानंतर तो त्याच दिवशी संध्याकाळी मृत्यू पावल्याने त्याचे नातेवाईकांनी कास्टोडीयल डेथचा आरोप करीत माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मा. राज्यमंत्री (गृह-शहरे), मा.अध्यक्ष (राज्य मानवी हक्क आयोग) यांच्याकडे लेखी निवेदन सुपूर्द करून उच्चस्तरीय न्यायिक चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दोन्ही मृतकांच्या नातेवाईकांना त्यांच्या शरीरावर मारहाणीचे वळ, पाठीवर पट्ट्याने मारल्याचे वळ, कवटी फॅक्चर होऊन जबडा बाहेर आल्याचे दिसून आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मृतकाच्या नातेवाईकांनी पोलिसांकडे मागणी करूनही एफ.आय.आर. व रुग्णालयात भर्ती केल्याचे वैद्यकीय कागदपत्रांच्या प्रती देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनामार्फत कोणती प्रशासकीय व दंडात्मक तसेच कायदेशीर कार्यवाही तसेच चौकशीअंती आरोपी पोलिसांवर/दोषापितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) :** (१) सदर बंद्याच्या मृत्यु प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दि. ०८.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा. राज्यमंत्री (गृह/शहरे) यांच्याकडे उच्चस्तरीय न्यायिक चौकशीची मागणी केलेली आहे. तसेच मा. राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी दि. ०२.११.२०१८ रोजी उपायुक्त गुन्हे अन्वेषण यांचेमार्फत चौकशी होणेबाबत आदेश दिलेले आहेत.

(२) बंद्यास दि. १५.०९.२०१८ रोजी जे. जे. रुग्णालय येथे आंतररुग्ण म्हणून दाखल केले त्याच दिवशी मा. न्यायालयाचे आदेशाने जामिनावर मुक्त करण्यात आले होते व तेथील वैद्यकिय अधिकारी यांनी बंद्यास पुढील उपचारास्तव सामान्य रुग्ण म्हणून दाखल करुन घेतले होते.

मयत फिरोज शेख याच्या मृत्युबाबत दि. ३०.०९.२०१८ रोजी १३.४५ वा. जे.जे. रुग्णालय येथून ना.म.जोशी मार्ग पोलिस ठाणे यांना डेथ इन्टीमेशन प्राप्त झाल्यानंतर लगेच संबंधितांनी त्याचे नातेवाईकांना कळविले.

(३) सदर बंद्याच्या मृत्युप्रकरणी उच्च स्तरीय न्यायिक चौकशी करणेबाबतचे निवेदन/पत्र शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) दोन्ही बंद्यांना कारागृहात कोणत्याही प्रकारची मारहाण झालेली नाही.

मयत फिरोज शेख यांच्या हनुवटीवर जखम झालेली आहे. मयत अनवर मो. खालिद सय्यद याचे अंगावर कोणतीही जखम नसल्याबाबत इन्क्वेस्ट पंचनाम्यामध्ये नमूद आहे.

(५) दोन्ही मृतकांबाबत संबंधितांनी अपमृत्युची नोंद करण्यात आली असून त्याची चौकशी चालू आहे.

(६) सदर प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर व अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिलेले आहेत. तसेच मा. राज्य मानवी हक्क आयोग यांनी दि. ०२.११.२०१८ रोजी मा. उपायुक्त, गुन्हे अन्वेषण यांचेमार्फत चौकशी होणेबाबत आदेश दिलेले आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील मे. अनाबार प्रोपटीजचे मालक व त्यांच्या भागीदारांनी बनावट विकास करारनामा व कुलमुखत्यार करुन जमिन बळकाविल्याबाबत

**(३४) १३०९५२ (०८-१२-२०१८) श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि. ठाणे) पश्चिमेतील बारावे गाव येथे राहणारे श्री.श्रीकांत गंगाराम कांबेकर ऊर्फ पाटील यांच्या कुटुंबाच्या मालकीची मौजे बारावे येथील स.क्र. १३/१, १३/३, १८/१ या जमिनीचा बनावट विकास करारनामा तसेच खोटे कुलमुखत्यार करुन मुंबई येथील मे. अनाबार प्रोपटीजचे श्री.सुनील श्यामसुंदर केडिया व त्यांचे भागीदार यांनी सन १९९७ ते २०१८ या कालावधीत जमीन बळकावल्याप्रकरणी खडकपाडा (कल्याण) पोलीस ठाण्यात माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी खडकपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २३६/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १९९, २०० व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामान्य प्रशासन विभाग व माहिती व जनसंपर्क संचालनालय यांच्या अधिपत्याखाली असलेले मंत्रालय केंद्रीय ग्रंथालय बंद करण्याच्या धोरणाबाबत**

**(३५) १३१०५३ (१०-१२-२०१८) डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामान्य प्रशासन विभाग व माहिती व जनसंपर्क संचालनालय यांच्या अधिपत्याखाली असलेले मंत्रालय केंद्रीय ग्रंथालय बंद करण्याचा धोरण शासनाने ठरविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९५५ मध्ये शासनाने स्थापन केलेल्या या ग्रंथालयातील ग्रंथ व ग्रंथेत्तर साहित्य अन्य शासकीय संस्थांना देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रंथालयात काम करण्याऱ्या ग्रंथालयीन प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी यांचे समायोजन अन्य कोणत्या विभागात करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे,

(४) तसेच, सदर ग्रंथालय बंद करुन त्या ठिकाणी कोणता विभाग शासनाने सुरु करायचे ठरविले आहे, याबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०१९) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या जिर्णोध्दाराबाबत**

**(३६) १३१२५९ (११-१२-२०१८) श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर हे केंद्रीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत नसल्याचे संबंधित विभागाने मंदिर व्यवस्थापनाला कळविले असल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या जिर्णोध्दाराचा, मंदिराचा तसेच चंद्रभागा वाळवंटाचा पौराणिक धर्तीवर जिर्णोध्दार करण्यात येणार असल्याचे मंदिर प्रशासनाकडून सांगण्यात आल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त जिर्णोध्दार व उपाययोजना करण्याबाबत शासनाने व मंदिर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराची पाहणी व तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत समितीद्वारे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद यांना करण्यात आले होते तथापि सोलापूर जिल्हा मुंबई सर्कल मध्ये येत असल्याचे कळविण्यात आल्यामुळे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई यांना सर्वेक्षण करण्याची विनंती करण्यात आली होती. तथापि विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पंढरपूर भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई यांच्या अखत्यारित येत नसल्याचे कळविले आहे तथापि मंदिराची पाहणी करुन मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. या सूचनांची अंमलबजावणी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद व मुंबई तसेच महाराष्ट्र राज्य, पुरातत्व कार्यालय मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील चिंचोळी एमआयडीसी मध्ये अतिक्रमण व चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(३७) १३१४५१ (०८-१२-२०१८) कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील चिंचोळी एमआयडीसी मध्ये उद्योगाची व्याप्ती वाढली असल्याने त्याठिकाणी उद्योजकांना चोरी, अतिक्रमण आदि अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिंचोळी एमआयडीसी मधील चोरी व अतिक्रमणाच्या वाढत्या प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१९) :** (१) चिंचोली एमआयडीसी मध्ये चोरी प्रकरणी एकूण ५ गुन्हे दाखल आहेत. उक्त गुन्ह्यात चोरीला गेलेल्या एकूण ४,१८,०००/ किंमतीच्या मुद्देमालापौकी २०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन ४ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदरील गुन्ह्यांपैकी १ गुन्हा उघडकीस आला असून उर्वरित गुन्ह्यांचा तपास चालू आहे. तसेच, अतिक्रमण बाबत घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) चिंचोळी एमआयडीसी मधील चोरी व अतिक्रमणाच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी दररोज २४ तास पेट्रोलिंग करण्यात येत आहे. तसेच, एमआयडीसी मधील उद्योजकांना दर महिन्याला पोलीस स्टेशनला बोलावुन त्यांची बैठक घेतली जाते व त्यांचे अडचणी जाणून त्या दुर केल्या जातात.
(३) विलंब झालेला नाही.

---

**खेड (जि.पुणे) येथील सेझ मध्ये कार्गो विमानतळ होणेबाबत**

**(३८) १३१६०८ (१०-१२-२०१८) श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) परिसरात असणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील (सेझ) आंतरराष्ट्रीय कंपन्यांना मालाची ने-आण करण्यासाठी औद्योगिक वसाहतीच्या जवळ कार्गो विमानतळ आवश्यक असल्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या शिष्टमंडळाने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.उद्योगमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळेगाव,चाकण आणि रांजणगाव येथील उद्योगांना जवळ असणाऱ्या खेड (जि.पुणे) येथील सेझ मधील जागेत कार्गो विमानतळ व्हावे या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यासाठी सुमारे २८३२ हेक्टर जमीन अधिसूचित करण्यात आली आहे. त्यामुळे, केवळ कार्गोकरिता स्वतंत्र विमानतळ खेड एसईझेडजवळ उभारणे तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहराच्या मध्यभागातून होणाऱ्या जडवाहतूकीच्या वेळेत बदल करण्याबाबत**

**(३९) १३१६५४ (०८-१२-२०१८) कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहराच्या मध्यभागातून होणाऱ्या जडवाहतूकीस असलेल्या बंदीच्या वेळेबाबत पोलीस आयुक्त, सोलापूर यांना प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाच्या वेळेमध्ये बदल करण्याबाबतची मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पोलीस आयुक्तालयाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सोलापूर शहराच्या मध्यभागातून होणाऱ्या जड वाहतुकीच्या वेळेत बदल केल्याबाबतचा जाहिरनामा पोलीस आयुक्त, सोलापूर यांनी प्रसिध्द केलेला आहे.

सदर जाहिरनाम्यानुसार सकाळी ०७.०० ते रात्रौ २१.०० या कालावधीत शहरात जड वाहतुकीस बंदी असून रात्रौ २१.०० ते सकाळी ०७.०० या कालावधीत जड वाहतूक चालू आहे. दुपारी १३.०० ते १६.०० पर्यंत फक्त सोलापूर शहरामध्ये माल भरण्यासाठी व उतरवण्यासाठी येणाऱ्या वाहनांना प्रवेश देण्यांत आला आहे.

याव्यतिरिक्त सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटप करावयाचे धान्य वाहतूक करणारी जड मालवाहू वाहने, जीवनावश्यक वस्तू, पेट्रोलियम पदार्थांचे टँकर, दूध व पाण्याचे टँकर, रुग्णालयाच्या उपयोगासाठीची ऑक्सीजन सिलेंडर तसेच स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरची वाहतूक करणारी वाहने, अग्निशमन दलाची वाहने, पोलीसांची तसेच सैन्य दलाची जड मालवाहू वाहने, शहरातील विकास कामासाठी व स्मार्ट सिटी अंतर्गत शहरात येणारी पासधारक वाहने यांना या आदेशातून वगळण्यांत आले आहे.

सदर आदेशाची दिनांक १३.१०.२०१८ पासून अंमलबजावणी चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(४०) १३१७७९ (११-१२-२०१८) श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे इमारतीचे बांधकाम करण्याबाबतच्या गत दोन वर्षापासून प्रलंबित असलेल्या रुपये १० कोटीच्या प्रस्तावास तातडीने प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिंनाक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री आणि प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी यापुर्वी सुध्दा प्रधान सचिव विधी व न्याय विभाग यांना वारंवार प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ब्रम्हपूरी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारतीचे बांधकाम करण्याबाबतच्या गत दोन वर्षापासून प्रलंबित असलेल्या रुपये १० कोटीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. ५२६ (३४)

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१९) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
मा.मुख्यमंत्री महोदय यांना दि. ३ ऑक्टोबर, २०१८ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. तसेच प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग यांना दि.१८ जून, २०१८ व दि. ३० जुलै, २०१८ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग यांना दि.१८ जून, २०१८ व दि. ३० जुलै, २०१८ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याकरिता विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सीसीबी-१११७/प्र.क्र.१६२/का.१३, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१८ अन्वये रुपये ९,९२,३१,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर काम माहे, नोव्हेंबर, २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात अर्थसंकल्पीत करण्यात आले असून, सदर कामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कै. ना. मे. लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई येथील संचालकांनी शासन निधीचा केलेला अपहाराबाबत**

**(४१) १३१८०२ (१०-१२-२०१८) श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कै. ना. मे. लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई येथील संचालकांनी सन २००६ ते सन २०१७ या कालावधीत त्यांच्या निवासस्थानाचे विद्युत देयके शासन निधीमधून भागविली ही बाब शासनाच्या सन २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संस्थेच्या संचालकांनी माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान यासाठी रुपये ८,७३,९३३/- इतकी अपहाराची रक्कम चलनाने शासकीय तिजोरीत भरणा केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संचालकांना सदर अपहाराच्या रक्कमेवरील व्याज भरण्यापासून शासनाने सूट देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या निदर्शनास येऊन देखील संचालकांच्या निवासस्थानाची विद्युत देयके शासकीय निधीमधून भागविण्यात येत होती, हे ही खरे आह काय,
(५) असल्यास, सदर अपहाराची रक्कम शासन तिजोरीत भरणा करण्याची तयारी संचालकांनी दाखविली म्हणून संबंधिताविरुद्ध कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, संबंधितांविरुदध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-०१-२०१९) :** (१) सदरची बाब २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) शासनाच्या दि.०७/०३/२०१८ रोजीच्या ज्ञापनान्वये निर्देशित केल्याप्रमाणे डिसेंबर, २००६ पासून दि.३०/०९/२०१७ पर्यन्त विद्युत देयकाची रक्कम रु.८,७३,९३३/- संस्थेच्या तत्कालीन संचालकांनी भरणा केली आहे.

(३) व्याजाच्या वसूलीच्या अनुषंगाने वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात येत असून, त्यांच्या अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४), (५) व (६) सदरची बाब शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर तत्कालीन संचालक यांचेकडून विद्युत देयकाच्या रक्कमेची वसुली करण्यात आली आहे. तसेच सदर रकमेवरील व्याजाच्या आकारणीबाबत वित्त विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत संबंधितांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथे खाजगी बसला झालेला अपघात

**(४२) १३२४१३ (१०-१२-२०१८) डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथे दिनांक १५ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास खाजगी बसची काळी पिवळीला धडक लागून भिषण अपघात झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातात किती लोक जखमी झाली व किती जणांचा मृत्यु झाला आहे,

(३) असल्यास, या अपघाताची चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच अपघातातील जखमींना व मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

सदर घटना दिनांक १६.०७.२०१८ रोजी सुमारे ०७.०० चे सुमारास घडली आहे.

(२) सदर अपघातात एकही प्रवासी मयत झालेला नसून नऊ जण जखमी झालेले आहेत.

(३) दिनांक १६.०७.२०१८ रोजी सकाळी ०७.०० चे सुमारास देऊळगांवराजा ते चिखली जात असलेल्या काळी पिवळी टॅक्सीला लक्झरी ट्रॅव्हल्स बसची धडक बसल्याने झालेल्या अपघातात काळी पिवळी टॅक्सीतील चालकासह एकूण ९ प्रवासी जखमी झाले. जखमींना उपचारार्थ रुग्णालयात नेण्यांत आले.

याप्रकरणी पोलीस स्टेशन देऊळगांव राजा येथे दिनांक १६.०७.२०१८ रोजी अप. क्र. २७७/१८, भा.दं.वि. कलम २७९ व ३७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. बसचालक आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने दिनांक २२.०९.२०१८ रोजी विशेष न्यायालयात

आरोपपत्र दाखल करण्यांत आले आहे. गुन्हा सध्या न्यायप्रविष्ट आहे.

जखमींना आर्थिक मदत मिळणेकरीता त्यांच्या नातेवाईकांनी मागणी केल्याप्रमाणे सर्व कागदपत्रे पुरविण्यांत आली आहेत. तसेच अपघात दावा प्राधिकरणास आवश्यक कागदपत्रे सादर करण्यांत आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेरा बु. (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील वाकी बु. येथे मेटॅडोरची मोटारसायकलला धडक लागून झालेला भिषण अपघात**

**(४३) १३२४१६ (१०-१२-२०१८) डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेरा बु. (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील वाकी बु. येथे दिनांक १५ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास मेटॅडोरची मोटारसायकलला धडक लागून भिषण अपघात झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातात किती लोक जखमी झाले व किती मृत्यु पावले आहेत,

(३) असल्यास, या अपघाताची चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच अपघातातील जखमींना व मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

सदर अपघात दिनांक १६.०७.२०१८ रोजी अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीतील अंचरवाडी फाटा येथे घडला आहे.

(२) सदर अपघातात कोणीही मयत झाले नसून मोटारसायकलस्वार जखमी झाला आहे.

(३) दिनांक १६.०७.२०१८ रोजी अंचरवाडी फाटा येथून चिखली कडे जात असलेल्या मोटारसायकलला समोरुन येणाऱ्या वाहनाने धडक मारुन झालेल्या अपघातामध्ये मोटारसायकलचालक जखमी झाला. प्राप्त तक्रारीवरुन मोटारसायकलला धडक देणाऱ्या आरोपी वाहनचालकाविरुध्द पो.स्टे. अंढेरा येथे अपक्र. २३५/१८, भा.दं.वि. कलम २७९, ३३८ व ४२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यांत आला आहे.

आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने दिनांक १५.१०.२०१८ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यांत आले असून गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

जखमींना आर्थिक मदत मिळणेकरीता त्यांच्या नातेवाईकांना तसेच अपघात दावा न्यायाधिकरणास सर्व कागदपत्रे पुरविण्यांत आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा-कोरगांव तालुक्यातील (जि.सातारा) साखर कारखान्याचे भंगार देतो असे सांगत केलेली फसवणूक**

**(४४) १३२८५८ (१०-१२-२०१८) श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा-कोरगांव तालुक्यातील (जि.सातारा) साखर कारखान्याचे भंगार देतो असे सांगत रुपये २८ लाखांची फसवणूक केल्याच्या घटनेबाबत रहिमतपूर येथे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान गुन्ह्याची नोंद करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१९) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी रहिमतपूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १७८/२०१८ भा.दं.वि. कलम ३९५ अन्वये ५ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**मजरेकाशी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील एका बालिकेवर झालेला अत्याचार**

**(४५) १३२९१२ (१०-१२-२०१८) श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मजरेकाशी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील एका आठ वर्षीय बालिकेवर दिनांक १५ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास अत्याचार झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर गुह्यातील आरोपींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०१९) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार चिपळूण पोलीस ठाणे, जि. रत्नागिरी येथे गु.र.नं. १६९/०१८ भा.दं.वि. कलम ३७६ (एबी), ५०६, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,५ (एम), ६,८ प्रमाणे आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपीविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले असून सद्यस्थितीत सदरचा खटला न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील सातपूर औद्योगिक वसाहतीतील मुख्य रस्त्यावर अवैधरित्या कंटेनरपार्किंग होत असल्याबाबत**

**(४६) १३३१५४ (१०-१२-२०१८) श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील सातपूर औद्योगिक वसाहतीतील मुख्य रस्त्यावर अवैधरित्या कंटेनर पार्किंग होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैधरित्या कंटेनर पार्किंगच्या आड अवैध धंदेही होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

नाशिक येथील सातपूर औद्योगिक वसाहतीत २०,००० चौ.मि. क्षेत्रामध्ये पे अँड पार्क ची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. परंतु सदर पार्किंग पूर्ण भरल्यावर काही वेळेला रस्त्याच्या कडेला काही कंटेनर पार्क होतात, त्यावेळी त्यांचेवर वेळीच कारवाई करण्यांत येते.

(२) हे खरे नाही.

(३) सातपूर औद्योगिक वसाहतीत अवैधरित्या कंटेनर पार्किंग करणाऱ्यांवर सातपूर पोलीस ठाणे आणि शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर यांचेमार्फत मोटार वाहन कायदा, कलम १२२/१७७ प्रमाणे एकूण ३३ केसेस करण्यांत आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जयपुर (राजस्थान) येथील पीएसील कंपनीने नाशिकसह राज्यभरातील नागरिकांची केलेली फसवणूक**

**(४७) १३३२४९ (१७-११-२०१८) श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जयपूर (राजस्थान) येथील पीएसील या रिअल इस्टेट क्षेत्रातील कंपनीने सहा वर्षात साडेबारा टक्के परतव्याच्या आमिषाने लोकांकडून गुंतवणुकीच्या रक्कमा स्वीकारुन त्याबदल्यात संबंधितांना एक लाख रुपयाच्या गुंतवणुकीपोटी गुंठाभर जमिनी देण्याचे आमिष दाखवून या योजनेत नाशिक जिल्ह्यातीलच नव्हे तर देशभरातील गुंतवणुकदारांची फसवणुक झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार संबंधीत सर्व दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१८) :** (१) व (२) पर्ल्स (पी.ए.सी.एल) कंपनीने केलेल्या फसवणूकी संदर्भात राज्यात बीड घटकात २, लोहमार्ग पुणे घटकात १, अमरावती घटकात १, गोंदिया घटकात १, पुणे शहर घटकात १ व सातारा येथे १ असे एकूण ७ गुन्हे दाखल असून त्यापैकी एका गुन्ह्यात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे, एका गुन्ह्यात मा. न्यायालयात 'अ' वर्ग समरी दाखल आहे व एका गुन्ह्यात 'क' वर्ग समरी दाखल आहे. उर्वरित गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

पर्ल्स (पी.ए.सी.एल) कंपनीच्या गुंतवणूकदारांना त्यांचा परतावा करण्यासाठी सदर कंपनीच्या मालमत्तेच्या विक्री/विल्हेवाटीसाठी संनियंत्रण करण्यासाठी श्री.आर.एम.लोढा, माजी सरन्यायाधीश, यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यास मा. सर्वोच्च न्यायालयाने भारतीय प्रतिभूती आणि विनियम मंडळ (सेबी) यांस निर्देश दिले आहेत. गुंतवणुकदारांना त्यांच्या गुंतवणुकीच्या रक्कमा परत करण्याची कार्यवाही सेबीमार्फत सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील काटोल व नरखेड या दोन तालुक्यांतील पोलीस पाटीलांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४८) १३३७३४ (०६-१२-२०१८) श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील काटोल व नरखेड या दोन तालुक्यांत शासनस्तरावर पोलीस पाटलांची २५६ पदे मंजूर असून त्यापैकी १७२ पदे कार्यरत असून ८४ पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पोलीस पाटीलांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१९) :** (१) काटोल उपविभागात पोलीस पाटीलांची एकूण २५६ पदे मंजूर असून त्यापैकी १४६ पदे रिक्त होती. पैकी एका गांवाची आबादी निरंक असल्यामुळे एकूण १४५ पोलीस पाटील यांची पदे रिक्त आहेत.
(२) १४५ गांवातील पोलीस पाटील पदभरती प्रक्रिया सुरु करण्यांत आली असून त्यापैकी ९२ गावांमध्ये आरक्षणानुसार अर्ज प्राप्त झाल्यामुळे सदर गावांची पदे भरण्यांत आली आहेत. उर्वरित ५३ गावांमध्ये संबंधीत आरक्षणाचे उमेदवार नसल्याने पदे भरण्यांत आली नाहीत. ३१ पोलीस पाटील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांची पदे रिक्त झाली आहेत.

सन २०१८ ची पोलीस पाटील यांची बिंदूनामावली तयार करण्यांत येत असून बिंदुनामावली मंजूर झाल्यानंतर पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्यांत येतील.
(३) कार्यवाही सुरु आहे.

---

**व्यवसायात फसवणूक झाल्याने उबेर चालकाने केलेली आत्महत्या**

**(४९) १३३९०० (१०-१२-२०१८) श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उबेर व्यवसायात फसवणूक होत असल्याच्या नैराश्यातून श्री.उत्तम गारगोटे या उबेर टॅक्सी चालकाने माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) मयत यांच्या पत्नीने दिलेल्या जबावानुसार दिनांक २४.१०.२०१८ रोजी मयत दारु पिवून घरी आले होते. पत्नीसोबत दांडिया पाहून घरी आल्यावर जेवण करायला बसत असताना त्यांच्या छातीत दुखू लागल्याने त्यांच्या पत्नीने त्यांना प्रथम फॅमिली डॉक्टर नेले असता डॉक्टरांनी त्यांना राजावाडी रुग्णालय येथे नेण्यास सांगितले. त्यानुसार त्यांना राजावाडी रुग्णालय येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून मयत घोषीत केले. सदर प्रकरणी घाटकोपर पोलीस ठाणे, मुंबई येथे अपमृत्यू नोंद क्र.२०८/१८ दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनई (ता.जि.अहमदनगर) येथील श्री व्यंकटेश ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालकांवर दाखल केलेला गुन्हा**

**(५०) १३४०२४ (१०-१२-२०१८) श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनई (ता.जि.अहमदनगर) येथील श्री व्यंकटेश ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांसह ११ संचालकांवर सोनई पोलीस ठाण्यात फसवणूक व अपहाराचा गुन्हा माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, उक्त प्रकरणात किती लोकांची फसवणूक झाली आहे, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५२६ (४१)

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी सोनई पोलिस ठाणे येथे गु.र.क्र.१५३/१८ भा.दं.वि.स. कलम ४०६, ४०९, ४२०, ४६७, ४६८, १२० (ब) सह महाराष्ट्र ठेविदारांचे हितसंरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे ११ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सद्यस्थितित गुन्हा तपासावर आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.